सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on


E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ११८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. १८ जून २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# ठाकरे गटाची गैरहजर ६ खासदारांना कारणे दाखवा नोटीस

## सावंत म्हणाले- त्यांना उत्तर देण्यासाठी ७ दिवसांचा वेळ

## गृहविभागाचे ६ खासदारांना Y प्लस सुरक्षेचे आदेश





भाऊसाहेब वाकचौरे, शिर्डी | नागेश पाटिल आष्टीकर, हिंगोली | संजय दिना पाटील, मुंबई ईशान्य | संजय हरिभाऊ जाधव, परभणी | ओमप्रकाश राजे, निंबाळकर | संजय देशमुख, यवतमाल-वाशीम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८मुंबई–** दिल्लीत शिवसेना (यूबीटी) संसदीय पक्षाची बैठक सुरू झाली. केवळ तीन लोकसभा खासदार, अनिल देसाई, अरविंद सावंत आणि राजाभाऊ वाझे, उपस्थित झाले. पक्षाने आपल्या सर्व लोकसभा खासदारांना गुरुवारी सकाळी ११ वाजता दिल्लीतील बैठकीला उपस्थित राहण्याचे निर्देश देणारा व्हीप जारी केला होता.

बैठकीपूर्वी पत्रकार परिषदेत यूबीटीचे राज्यसभा खासदार संजय राऊत म्हणाले की, आमच्या खासदारांचे अपहरण झाले आहे. जे बैठकीला येतात ते आमच्यासोबत आहेत, जे येत नाहीत ते गद्दार आहेत. दरम्यान, शिवसेनेचे विधान परिषद सदस्य चंद्रकांत रघुवंशी यांनी गुरुवारी दावा केला की, यूबीटीचे सहा खासदार शिवसेनेत सामील झाले आहेत. ते म्हणाले की, 'ऑपरेशन टायगर' पूर्ण झाले आहे. वास्तविक पाहता, णइढ च्या नऊ खासदारांपैकी सहा जणांनी बंड केले आहे. सूत्रांनुसार, या सहा खासदारांनी बुधवारी सकाळी ९:३० वाजता लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र पाठवून शिंदे गटात सामील होण्याची इच्छा व्यक्त केली आहे. तथापि, अध्यक्ष किंवा बंडखोर गटाकडून याला अद्याप दुजोरा मिळालेला नाही.शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या संसदीय दलाच्या बैठकीनंतर खासदार अरविंद सावंत आणि खासदार संजय राऊत यांनी गैरहजर खासदारांविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. बैठकीला अनुपस्थित राहिलेल्या खासदारांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येणार असून, सात दिवसांत उत्तर न दिल्यास पुढील कारवाई केली जाईल, असा इशारा सावंत यांनी दिला.

बैठकीनंतर पत्रकार परिषदेत बोलताना अरविंद सावंत म्हणाले, पक्षाचा आदेश सर्व खासदारांना मिळाला होता. तरीही काही सदस्य बैठकीला उपस्थित राहिले नाहीत. आम्हाला वाटतं हा पक्षद्रोह आहे. त्यांनी सांगितले की, अनुपस्थित राहिलेल्या सर्व खासदारांना आजच कारणे दाखवा नोटीस पाठवण्यात येणार आहे. संध्याकाळपर्यंत प्रत्येकाला नोटीस मिळेल आणि सात दिवसांच्या आत त्यांना उत्तर द्यावं लागेल.या खासदारांवर पुढे काय कारवाई होणार, याबाबत विचारले असता सावंत म्हणाले, कायदा त्यांच्यावर जी कारवाई करेल ती होईल. आम्ही लोकसभा अध्यक्षांनाही याबाबत पत्र लिहिणार आहोत. यामुळे ठाकरे गट आता केवळ पक्षांतर्गत कारवाईवर न थांबता संसदीय आणि कायदेशीर लढाईही लढण्याच्या तयारीत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### 'ओमराजे दिल्लीत नाहीत, पुण्यात आहेत'

दरम्यान, संजय राऊत यांनी काही खासदारांच्या लोकेशनबाबतही दावा केला. ओमराजे निंबाळकर दिल्लीत नाहीत, ते पुण्यात आहेत. संजय दिना पाटील मुंबईत आहेत. ते बैठकीला आले नाहीत, पण ते त्यांच्यासोबत नाहीत. राऊत म्हणाले की, उर्वरित खासदार नेमके कुठे आहेत याची माहिती अद्याप मिळालेली नाही.

# प्रवाशांच्या सेवेत येणार 'देवाभाऊ टॅक्सी', युवकांना मिळणार रोजगार





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७मुंबई–** मुंबईकरांसाठी मोठी बातमी! ओला, उबेर आणि रॅपिडोसारख्या खासगी कॅब सेवांना पर्याय म्हणून लवकरच 'देवाभाऊ टॅक्सी सेवा' सुरू करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, ही सेवा परवडणाऱ्या दरात उपलब्ध होणार असल्याने सर्वसामान्य मुंबईकरांना कमी खर्चात प्रवासाचा पर्याय मिळणार आहे.

भाजप आमदार प्रवीण दरेकर यांच्या संकल्पनेतून ही सेवा सुरू करण्यात येत आहे. या उपक्रमामुळे प्रवाशांना स्वस्त आणि दर्जेदार सेवा मिळण्यासोबतच हजारो युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. प्रवीण दरेकर यांनी सांगितले की, 'भारत टॅक्सी'च्या धर्तीवर मुंबई आणि एमएमआर परिसरात 'देवाभाऊ सेवा सहकारी टॅक्सी' आणि 'छावा टॅक्सी सेवा' सुरू केली जाणार आहे.यासंदर्भात चर्चा पूर्ण झाली असून वाहतूक मंत्री प्रताप सरनाईक यांनी आवश्यक धोरण निश्चित केले आहे. या योजनेच्या पहिल्या टप्प्यात एमएमआर परिसरात २,००० ते ५,००० टॅक्सी सुरु करण्यात येतील. दरम्यान, भाजप आमदार प्रसाद लाड यांनीही या प्रकल्पाबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे.मुंबई बँकेच्या माध्यमातून किमान ३,००० तरुणांना टॅक्सी उपलब्ध करून दिली जाणार आहे. यासाठी अडाणी विमानतळ व्यवस्थापनासह विविध हॉटेल्स आणि संस्थांशी प्राथमिक चर्चा पूर्ण झाली आहे. टॅक्सी मिळणाऱ्या युवकांना आवश्यक परवान्यांसह व्यवसायाची संधी दिली जाणार आहे. या प्रकल्पामुळे थेट ३,००० तरुणांना रोजगार मिळेल. आता ही सेवा प्रत्यक्षात कधी सुरू होते याकडे मुंबईकरांचे लक्ष लागले आहे.

# नागपुरातून वाढणार भारताची संरक्षण शक्ती!

## राजनाथ सिंह यांच्या हस्ते १० हजार टन क्षमतेच्या अत्याधुनिक प्रकल्पाचे उद्याला भूमिपूजन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८ नागपूर** केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह उद्या शुक्रवारी, १९ जून रोजी नागपुरातील अंबाझरी येथील यंत्र इंडिया लिमिटेड (वायआयएल) आयुध निर्माणी परिसरात अत्याधुनिक १० हजार टन क्षमतेच्या ल्युमिनियम एक्सट्रूजन प्रेस प्रकल्पाचे भूमिपूजन करणार आहेत. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, संरक्षण उत्पादन विभागाचे सचिव संजीव कुमार यांच्यासह संरक्षण उत्पादन विभाग आणि यंत्र इंडिया लिमिटेडचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत.ही अत्याधुनिक एक्सट्रूजन प्रेस संरक्षण उत्पादन क्षेत्रासाठी एक महत्त्वपूर्ण राष्ट्रीय संपत्ती ठरणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून संरक्षण आणि एरोस्पेस क्षेत्राच्या गरजांनुसार मोठ्या आकाराचे, उच्च मजबुतीचे आणि अत्यंत अचूक ल्युमिनियम मिश्रधातू (लॉय) उत्पादने देशातच तयार करणे शक्य होणार आहे. या प्रकल्पामुळे महत्त्वाच्या ल्युमिनियम एक्सट्रूडेड घटकांच्या आयातीवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत मिळेल आणि 'आत्मनिर्भर भारत' अभियानाला अधिक बळकटी मिळेल. तसेच देशाची संरक्षण उत्पादन क्षमता वाढविणे आणि स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित उत्पादनाला प्रोत्साहन देणे, या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

# अमरावती विधान परिषद निवडणुकीत

# ९४.६८ टक्के मतदान



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती,**

अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी गुरुवारी झालेल्या मतदानात ४५१ पैकी ४२७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यामुळे जिल्ह्यात एकूण ९४.६८ टक्के मतदान नोंदविण्यात आले. सात मतदान केंद्रांपैकी धारणी, अचलपूर, मोर्शी आणि चांदूर रेल्वे या चार केंद्रांवर शंभर टक्के मतदान झाले, तर तिवसा–भातकुली केंद्रावर सर्वात कमी ६८.४२ टक्के मतदान झाले.या निवडणुकीत काँग्रेसने आपल्या नगरसेवकांना तटस्थ राहण्याचे निर्देश दिले होते. मात्र अमरावती महानगरपालिकेतील काँग्रेसचे सहा नगरसेवक आणि वंचित बहुजन आघाडीचा काँग्रेस समर्थक एक नगरसेवक अशा एकूण सात जणांनी पक्षाच्या आदेशाकडे दुर्लक्ष करून मतदान केल्याने ते बंडखोर ठरल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. धीरज हिवसे, विक्की वानखेडे, लुबना तनवीर, जयश्री जठाळे, प्रशांत महल्ले, अफसर शाह तसेच समर्थक नगरसेवक भल्ला यांनी मतदान केल्याचे समोर आले आहे.जिल्ह्यातील ४५१ मतदारांपैकी २४ जणांनी मतदान प्रक्रियेत सहभाग घेतला नाही. दर्यापूर येथे एक, तिवसा येथे १२ आणि अमरावती केंद्रावर ११ नगरसेवक अनुपस्थित राहिले. काँग्रेसने आपल्या ११८ नगरसेवकांना मतदानापासून दूर राहण्याचे निर्देश दिले होते. मात्र त्यापैकी केवळ २४ जणांनीच पक्षाच्या भूमिकेचे पालन केल्याचे चित्र दिसून आले.मतदानाची टक्केवारी सकाळी १० वाजेपर्यंत ६.८७ टक्के होती.

दुपारी १२ वाजेपर्यंत ती ४५.०१ टक्क्यांवर पोहोचली. दुपारी २ वाजता ८७.८० टक्के मतदान पूर्ण झाले, तर सायंकाळी ४ वाजेपर्यंत अंतिम मतदान ९४.६८ टक्क्यांवर जाऊन पोहोचले.दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक शेख जफर शेख जब्बार हे गंभीर आजाराने त्रस्त असतानाही मतदानासाठी केंद्रावर पोहोचले. त्यांच्या मतदानानंतर आमदार संजय खोडके, आमदार सुलभा खोडके आणि यश खोडके यांनी मतदान केंद्र सोडले.तसेच काँग्रेसचे नगरसेवक विक्की वानखेडे आणि प्रशांत महल्ले हे प्रसारमाध्यमे व राजकीय कार्यकर्त्यांचे लक्ष टाळत मतदान केंद्रावर आले आणि मतदान करून तत्काळ निघून गेल्याचेही पाहायला मिळाले. विधान परिषद निवडणुकीतील या घडामोडींमुळे निकालापूर्वीच अमरावतीतील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

### सात केंद्रांवर चुरस; आमदारांनी सांभाळली मोर्चेबांधणी

अमरावती जिल्ह्यात मतदानासाठी एकूण ७ मतदान केंद्रे उभारण्यात आली होती. प्रत्येक केंद्रावर मतदारांना आणण्याची आणि नेण्याची जबाबदारी स्थानिक नेत्यांवर सोपवण्यात आली होती. स्थानिक आमदार स्वतः मतदारांच्या संपर्कात होते. अमरावती शहरातील भातकुली, अमरावती तहसील या दोन केंद्रांवर महायुतीचे उमेदवार प्रवीण पोटे पाटील यांनी स्वतः भेट देऊन प्रतिनिधींकडून मतदानाचा आढावा घेतला.

### मतदान केंद्रनिहाय मतदानाची टक्केवारी पुढीलप्रमाणे

| | |
|---|---|
| धारणी | – १०० टक्के |
| अचलपूर | – १०० टक्के |
| मोर्शी | – १०० टक्के |
| दर्यापूर | – ९८.३३ टक्के |
| तिवसा–भातकुली | – ६८.४२ टक्के |
| अमरावती | – ८८.४२ टक्के |
| चांदूर रेल्वे | – १०० टक्के– |



# रविकांत तुपकरांच्या आंदोलनाला हिंसक वळण:कार्यकर्ते आक्रमक

## मंत्रालयाबाहेर पोलिसांवर सुतळी बॉम्बफेक, तर गेटवेवर समुद्रात उड्या

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८मुंबई**

शेतकऱ्यांना सरसकट कर्जमुक्ती मिळावी आणि पीकविम्याचा प्रश्न सुटावा या मागणीसाठी शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी पुकारलेल्या अन्नत्याग आंदोलनाचा आज चौथा दिवस आहे. मात्र, चार दिवस उलटूनही सरकारने या आंदोलनाची कोणतीही दखल न घेतल्याने आणि तुपकर यांची प्रकृती चिंताजनक बनल्याने राज्यभरातील शेतकऱ्यांचा संताप अनावर झाला आहे. या आंदोलनाला आता अत्यंत हिंसक वळण लागले असून, मुंबईत मंत्रालयाबाहेर हायव्होल्टेज ड्रामा आणि विदर्भासह राज्यभरात सरकारी कार्यालये व टोलनाके पेटवून देण्याच्या धक्कादायक घटना घडल्या आहेत.

शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी रविकांत तुपकरांचे शेकडो कार्यकर्ते मुंबईत दाखल झाले होते. आज मुंबईच्या दोन अत्यंत महत्त्वाच्या ठिकाणांवर आंदोलकांनी आक्रमक पवित्रा घेतला.



**मंत्रालयाबाहेर सुतळी बॉम्बचा थरार**

मंत्रालयासमोरील एका झाडावर तुपकरांचा एक कार्यकर्ता हातात सुतळी बॉम्बने भरलेली बॅग घेऊन चढला. त्याला खाली उतरवण्यासाठी पोलिस पुढे सरसावले असता, त्याने थेट पोलिसांच्या दिशेने सुतळी बॉम्ब फेकला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. बॉम्ब फेकल्यानंतर हा कार्यकर्ता झाडावरच राष्ट्रगीत गाऊ लागल्याने पोलिसांची मोठी धावपळ उडाली.

दुसरीकडे, लातूर आणि इतर जिल्ह्यांतून आलेल्या मनसे आणि तुपकर समर्थकांनी थेट 'गेटवे ऑफ इंडिया' गाठले. 'मोदी सरकार हाय हाय' अशा घोषणा देत कार्यकर्त्यांनी थेट अरबी समुद्राच्या पाण्यात उड्या घेतल्या. पोलिसांनी तात्काळ बोटींच्या साहाय्याने या कार्यकर्त्यांना बाहेर काढले आणि कुलाबा पोलिस ठाण्यात ताब्यात घेतले.

कुलाबा पोलिसांनी कार्यकर्त्यांना ताब्यात घेतल्यानंतर आंदोलनस्थळावरून रविकांत तुपकर यांनी सरकारला तीव्र शब्दांत इशारा दिला आहे. मुंबईत शेतकऱ्यांचा आवाज दाबण्याचे दडपशाहीचे राजकारण सुरू आहे. शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या आमच्या कार्यकर्त्यांना कुलाबा पोलिसांनी विनाकारण डांबून ठेवले आहे. पोलिसांसोबत झालेल्या झटापटीत अनेक कार्यकर्ते जखमी झाले आहेत, पण त्यांची साधी वैद्यकीय तपासणीही करण्यात आलेली नाही. हा अन्याय आम्ही सहन करणार नाही. जखमींवर तातडीने उपचार करून सर्वांची बिनशर्त सुटका करा; अन्यथा राज्यभरातून हजारो शेतकरी मुंबईच्या दिशेने कूच करतील. त्यानंतर कायदा–सुव्यवस्थेची जी परिस्थिती निर्माण होईल, त्याला केवळ शासन आणि प्रशासनच जबाबदार असेल, असे ते म्हणालेत.

रविकांत तुपकर यांची प्रकृती खालावत चालल्याने ग्रामीण भागात शेतकऱ्यांचा उद्रेक पाहायला मिळत आहे. २४ तासांत राज्याच्या विविध भागांत तोडफोड आणि आगीच्या घटना घडल्या आहेत.

बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर आणि हिवरा आश्रम येथील तलाठी कार्यालये अज्ञात आंदोलकांनी रात्रीच्या सुमारास पेटवून देण्याचा प्रयत्न केला.

## संपादकीय ......

# पेपरफुटीमुक्त परीक्षेसाठी

*भारतातील वाढत्या पेपर लीक प्रकरणांनी परीक्षा व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. या पार्श्वभूमीवर परीक्षा प्रणालीत तांत्रिक, संरचनात्मक आणि प्रशासकीय पातळीवर आमूलाग्र बदल करण्याची गरज अधोरेखित होत आहे.भारतामधील पेपर लीक एखादी अपघाती घटना राहिलेली नाही. ती एक संघटित गुन्हेगारी साखळी बनली आहे. याचे मुख्य कारण परीक्षा प्रणालीतील सर्वात मोठी कमकुवत कडी म्हणजे 'मानवी हस्तक्षेप.' प्रश्नपत्रिका तयार होण्यापासून विद्यार्थ्यांच्या हातात पोहोचेपर्यंत ती प्रश्ननिर्माते, समीक्षक, भाषांतरकार, मुद्रणालय, वाहतूक व्यवस्था, जिल्हा अधिकारी, परीक्षा केंद्र आणि पर्यवेक्षक या प्रत्येक टप्प्यावर लीक होण्याची शक्यता निर्माण होते. असे वाटते, भारताची परीक्षा व्यवस्था अजूनही १९ व्या शतकात अडकलेली आहे का? परीक्षा प्रणालीचे संपूर्ण आर्किटेक्चर बदलावे लागणार आहे. आता भारताने डीजी एक्झाम मॉडेल स्वीकारण्याची वेळ आली आहे. भारताला आता 'डिजिटल परीक्षा क्रांती'ची गरज आहे. सर्वात मोठी समस्या म्हणजे तात्पुरती परीक्षा केंद्रे. दरवेळी वेगवेगळया शाळा आणि महाविद्यालयांना केंद्र बनवण्याऐवजी भारताने किमान १,००० कायमस्वरूपी सिक्युअर स्टँडर्ड टेस्टिंग सेंटर्स उभारणे आवश्यक आहे. या केंद्रांमध्ये २४ तास सीसीटीव्ही मॉनिटरिंग, आरएफ आणि ब्लुटूथ जॅमर्स, बायोमेट्रिक प्रवेश, सुरक्षित सर्व्हर रूम आणि शस्त्रधारी सुरक्षा असावी. या सेंटरवर वर्षभरात विविध परीक्षा घेता येतील. एकच पेपर, एकच दिवस आणि लाखो विद्यार्थी ही सर्वात मोठी कमजोरी आहे. एका लीकमुळे संपूर्ण परीक्षा धोक्यात येते. त्यामुळे बहु-सत्र परीक्षा, वेगवेगळे प्रश्न संच आणि बहु-टप्पा चाचण्या आता गरज बनली आहे. जेईई मेनमध्ये हे मॉडेल काही प्रमाणात यशस्वी ठरले आहे.पेपर लीक थांबवण्याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे 'पेपर' ही संकल्पनाच संपवणे. भारताने कॉम्प्युटर बेस्ड टेस्ट आणि कॉम्प्युटर अडाप्टिव्ह टेस्टिंगकडे जाणे अपरिहार्य आहे. सीबीटीमध्ये प्रश्न एन्क्रिप्टेड स्वरूपात सुरक्षित सर्व्हरवर ठेवले जातात. प्रत्येक विद्यार्थ्याला वेगळ्या क्रमाने प्रश्न दिसतात. स्क्रीन लॉकडाऊन, स्क्रीनशॉट ब्लॉकिंग आणि एआय निगराणी, यामुळे लीकची शक्यता कमी होते. सीएटी प्रणालीमध्ये प्रत्येक विद्यार्थ्याला वेगळे प्रश्न दिले जातात आणि पुढील प्रश्नाची कठीणाई मागील उत्तरांवर आधारित असते. त्यामुळे दोन विद्यार्थ्यांना एकसारखी परीक्षा मिळत नाही. अशा परिस्थितीत एखादा प्रश्न लीक झाला तरी त्याचा इतर विद्यार्थ्यांना फारसा फायदा होत नाही. जिथे पूर्ण सीबीटी तत्काळ शक्य नाही, तिथे कॉम्प्युटर असिस्टेड पेन अँड पेपर टेस्ट मॉडेल वापरता येईल. यात प्रश्नपत्रिका परीक्षेच्या काही तास आधी एन्क्रिप्टेड स्वरूपात केंद्रावर पाठवली जाईल. संयुक्त बायोमेट्रिक ऑथेंटिकेशननंतर सीसीटीव्हीखाली प्रिंटिंग होईल आणि ओव्हरनाईट स्टोअरेज टाळले जाईल. यामुळे ट्रान्स्पोर्टेशन लीक चेन संपुष्टात येऊ शकते. ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर करून प्रश्नपत्रिका कोणी पाहिली, कोणी डाऊनलोड केली आणि कोणत्या वेळी ॲक्सेस झाला याची इम्युटेबल ऑडिट ट्रायल तयार करता येऊ शकते. एआयआधारित मॉनिटरिंगद्वारे संशयास्पद स्कोअर पॅटर्न, एकाच केंद्रातील असामान्य निकाल, उत्तरांची साम्ये, चेहर्याच्या हालचाली, डोळ्यांची दिशा आणि आवाज यांचे रिअल टाईम विश्लेषण करता येऊ शकते. कोटा, दिल्ली आणि हैदराबादमधील कोचिंग उद्योग आता हजारो कोटींची समांतर अर्थव्यवस्था बनला आहे. काही संस्थांना प्रश्न आधीच कसे कळतात, हा प्रश्न गंभीर आहे.चीनची 'गावको' परीक्षा अभ्यासण्यासारखी आहे. जगातील सर्वात कठीण आणि सर्वात मोठ्या प्रवेश परीक्षांपैकी एक मानली जाणारी 'गावको' परीक्षा दरवर्षी कोट्यवधी विद्यार्थ्यांचे भविष्य ठरवते. मात्र, इतक्या मोठ्या प्रमाणावर परीक्षा घेऊनही चीनमध्ये भारतासारखी सातत्याने पेपर लीक संकटे क्वचित दिसतात. यामागील कारणे केवळ कठोर शिक्षा नसून संपूर्ण परीक्षा संरचनेतील मूलभूत फरक आहेत. भारतामध्ये नीट परीक्षा संपूर्ण देशासाठी एकाच प्रश्नपत्रिकेवर आधारित असते. त्यामुळे पेपर लीक झाला तरी त्याचे आर्थिक मूल्य प्रचंड वाढते. उलट चीनमध्ये 'गावको' पूर्णपणे केंद्रीकृत एकसंध पेपर प्रणालीवर चालत नाही. अनेक प्रांत स्वतंत्र प्रश्नपत्रिका तयार करतात किंवा प्रादेशिक व्हेरिएशन वापरतात. त्यामुळे एखाद्या भागात सुरक्षा भेदली तरी संपूर्ण देशावर त्याचा परिणाम होत नाही. चीनमध्ये प्रश्नपत्रिकेची जबाबदारी सुरुवातीपासून शेवटपर्यंत सरकारी नियंत्रणाखाली असते. मुद्रण, वाहतूक आणि वितरण प्रक्रियेत खासगी हस्तक्षेप अत्यंत मर्यादित असतो. प्रश्नपत्रिका वाहतुकीसाठी पोलिस एस्कॉर्ट, जीपीएस ट्रॅकिंग, सीलबंद वाहने आणि सतत निगराणी यांचा वापर केला जातो. भारतात मात्र अनेकवेळा मुद्रण आणि लॉजिस्टिक प्रक्रिया बाह्य विक्रेत्यांवर अवलंबून असल्याने सुरक्षा साखळी अधिक गुंतागुंतीची आणि असुरक्षित बनते.*

*चीनमध्ये परीक्षा ही केवळ कोचिंगकेंद्रित प्रक्रिया नाही. शालेय शिक्षण आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम यांच्याशी 'गावको' अधिक जवळून जोडलेली आहे. भारतात मात्र नीट-जेईई परीक्षांभोवती अब्जावधी रुपयांचा कोचिंग उद्योग निर्माण झाला आहे. या उद्योगाला परीक्षा परिणामांमध्ये थेट आर्थिक स्वार्थ जोडला गेल्याने प्रणालीवर सतत दबाव निर्माण होतो. मानसिक दबावाच्या दृष्टीनेही दोन्ही देशांमध्ये फरक दिसतो. चीनमध्ये 'गावको' पुन्हा देता येते, त्यामुळे एकच संधी अशी मानसिकता तुलनेने कमी असते. भारतात जेईई डव्हान्ससाठी मर्यादित प्रयत्न आणि नीटसाठी वर्षातून एकदाच परीक्षा असल्याने विद्यार्थ्यांमध्ये 'करा किंवा मरा' स्वरूपाचा ताण असतो. हा ताणच अनेकदा शॉर्टकट संस्कृतीला खतपाणी घालतो.गावको'मध्ये अनेक विषयांमध्ये निबंधात्मक आणि स्पष्टीकरणात्मक उत्तरांचा समावेश असतो. त्यामुळे संपूर्ण पेपर काही मिनिटांत फोटो काढून व्हॉटस्ॲपवर पसरवणे तुलनेने कठीण ठरते. नीट, जेईई मुख्यतः बहुपर्यायी प्रश्नांवर आधारित असल्याने प्रश्नपत्रिका डिजिटल माध्यमातून वेगाने प्रसारित करणे अधिक सोपे होते. चीनमध्ये परीक्षा भ्रष्टाचार हा केवळ शैक्षणिक गुन्हा मानला जात नाही; तो राज्य व्यवस्थेवरील हल्ला मानला जातो. त्यामुळे चौकशी, शिक्षा आणि कारवाई अत्यंत वेगाने होते. भारतात मात्र अनेक प्रकरणे वर्षानुवर्षे न्यायालयात प्रलंबित राहतात. आरोपी सहज जामीन मिळवतात आणि त्यामुळे प्रतिबंधात्मक संदेश कमकुवत पडतो.*

*दुर्गम गावातील विद्यार्थी तीन-तीन वर्षे अभ्यास करतो. पालक कर्ज काढतात. आयुष्याची बचत खर्च करतात आणि शेवटी कोणीतरी पैशाने पेपर विकत घेत असेल, तर हा केवळ गुन्हा नाही; तो संविधानातील समान संधीच्या तत्त्वावर हल्ला आहे. परीक्षा ही फक्त प्रश्नपत्रिका नसते. ती राज्य आणि विद्यार्थ्यांमधील एक पवित्र करार असतो. १९ व्या शतकातील पेन-अँड-पेपर मॉडेल २१ व्या शतकातील भारताला पुरेसा नाही. आता वेळ आली आहे तांत्रिक स्वायत्ततेची, एआयआधारित सुरक्षा व्यवस्थेची, डिजिटल पारदर्शकतेची आणि शून्य-सहनशीलतेच्या धोरणाची. रूपरेषा तयार आहे. तंत्रज्ञान उपलब्ध आहे. फक्त राजकीय आणि प्रशासकीय इच्छाशक्तीची गरज आहे. कारण प्रत्येक पेपर लीक विद्यार्थ्याचा आत्मविश्वास, कुटुंबाचे स्वप्न आणि राष्ट्राचा गुणवत्ताधारित सामाजिक करार उद्ध्वस्त करतो.*

# बी.एस्सी. भाग तीन निकालात एन्सिलेरी क्रेडिट घोळ

## निकाल दुरुस्त करून घोषित करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने नुकताच जाहीर केलेल्या बी. एस्सी. भाग -३, सेमेस्टर-६ च्या निकालामध्ये एन्सिलेरी क्रेडिट्सच्या गणनेबाबत निर्माण झालेल्या गंभीर प्रश्नाकडे अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाने विद्यापीठ प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. सोबतच शेकडो महाविद्यालयांनी प्रलंबित शुल्क न भरल्यामुळे रोखून ठेवण्यात आलेल्या निकालांच्या प्रश्नावरही महासंघाने तीव्र चिंता व्यक्त केली. या संदर्भात महासंघाच्या शिष्टमंडळाने परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.

अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाच्या विभागीय अध्यक्षा प्राचार्य डॉ. मीनल भोंडे यांच्या मार्गदर्शनात तसेच विभागीय महामंत्री प्रा. डॉ. मंगेश अडगोकर यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने सदर विषय मांडले. बी.एस्सी. सीबीसीएस अभ्यासक्रमातील अनेक विद्यार्थ्यांना एन्सिलेरी क्रेडिट्स अपूर्ण असल्याचे दर्शवून अनुत्तीर्ण घोषित करण्यात आल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. यावेळी शिष्टमंडळाने विद्यापीठाद्वारे वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या बी.एस्सी. सीबीसीएस संबंधीच्या दिशानिर्देशांचा संदर्भ



देत विद्यार्थ्यांनी प्रथम वर्षातील इंडक्शन प्रोग्राम, द्वितीय वर्षातील पर्यावरण अभ्यास, इंटर्नशिप, ओपन इलेक्ट्रिव्ह, एम.ओ.ओ.सी., कौशल्य अभ्यासक्रम तसेच विविध सहशैक्षणिक व अवांतर उपक्रमांमधून प्राप्त केलेले एन्सिलेरी क्रेडिट्स अंतिम गुणपत्रिकेत योग्य प्रकारे प्रतिबिंबित झाले आहेत किंवा नाहीत, याची सखोल पडताळणी करण्याची मागणी केली.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करून पात्र विद्यार्थ्यांवर कोणताही अन्याय होऊ नये तसेच क्रेडिट ट्रान्सफर अथवा क्रेडिट मॅपिंग प्रक्रियेमधील संभाव्य तांत्रिक त्रुटींमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी तातडीने आवश्यक कार्यवाही करण्यात यावी, अशी विनंतीही शिष्टमंडळाने केली. याप्रसंगी विद्यापीठाचे उपकुलसचिव राहुल नरवाडे यांच्यासह प्रा. डॉ. दिनेश खेडकर, प्रा. डॉ. धनंजय बिजवे, प्रा. डॉ. उमेश कनेरकर व प्रा. डॉ. प्रवीण परिमल आदी उपस्थित होते.

# ग्रामपंचायतींच्या सदस्यांची प्रसिद्धी शुक्रवारला

## ४४ ग्रामपंचायत, १९ ते २५ जूनपर्यंत हरकत कालावधी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८परतवाडा**

अचलपूर तालुक्यातील मुदत संपलेल्या ४४ ग्रामपंचायतींमध्ये ग्रामसभा घेऊन सदस्यपदाची आरक्षण सोडत शांततेत काढण्यात आली. या आरक्षणाचे प्रारूप प्रसिद्धी १९ ला होणार आहे. सदर आरक्षणावर १९ ते २५ जूनपर्यंत हरकती दाखल करण्याचा कालावधी आहे. अचलपूर तालुक्यातील ४४ ग्रामपंचायत सदस्यपदांची आरक्षण सोडत पार पडली आहे. आता या प्रभागनिहाय आरक्षणाचे प्रारूप प्रसिद्धी १९ ला होणार आहे. सदर आरक्षणावर १९ ते २५ जूनपर्यंत हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी राहणार आहे. आलेल्या हरकतींवर उपविभागीय अधिकारी सुनावणी घेऊन तीन जुलैला जिल्हाधिकाऱ्यांकडे अभिप्राय सादर होणार आहे. आठ जुलैला जिल्हाधिकाऱ्यांकडून आरक्षणाला प्रसिद्धी व १० जुलै रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी मान्य केलेल्या अंतिम प्रभागरचना (आरक्षण) अंतिम प्रसिद्ध (नमुना अ) जाहीर होणार असल्याचे महसूल निवडणूक विभागाकडून सांगण्यात आले आहे.-

# ब्राम्हणवाडा थडीत घरावर छापा ; ५.३२ लाखांचा प्रतिबंधित गुटखा व तंबाखू जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती** ग्रामीण पोलिसांनी गुटखा विक्री व साठवणुकीविरोधात मोठी कारवाई करत ब्राम्हणवाडा थडी येथील एका घरातून ५ लाख ३२ हजार ४२० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा, पान मसाला व सुगंधी तंबाखूचा साठा जप्त केला. या प्रकरणी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून मुख्य आरोपी फरार आहे.पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात कठोर कारवाईचे आदेश दिल्यानंतर १६ जून रोजी गुप्त माहितीच्या आधारे सौदागरपुरा, ब्राम्हणवाडा थडी येथे छापा टाकण्यात आला. मोहम्मद हफिज सौदागर उर्फ मुक्का यांच्या घराची झडती घेतली असता विविध कंपन्यांच्या पान मसाला, गुटखा व सुगंधी तंबाखूची मोठ्या प्रमाणात साठवणूक आढळून आली.कारवाईदरम्यान पानपराग, पानबहार, विमल, हॉट प्रिमियम पान मसाला, बाजीराव गोल्ड तसेच विविध प्रकारच्या तंबाखूची एकूण ५.३२ लाख रुपयांची सामग्री जप्त करण्यात आली. प्राथमिक तपासात मोहम्मद मुतल्लीफ सौदागर, मोहम्मद हफिज सौदागर, शेख अमिन, सैयद जुनेद आणि विक्रम उर्फ विक्की मंगलानी यांचा या प्रकरणात सहभाग असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे.या प्रकरणी ब्राम्हणवाडा थडी पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक २४३/२०२६ नुसार भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता

## शेतकर्यांना सानुग्रह अनुदान मिळणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती** मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या दालन झालेल्या बैठक सन २००६ ते २०१३ दरम्यान सरळ खरेदीधारक प्रकल्पग्रस्तांना विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने प्रति हेक्टरी ५ लक्ष सानुग्रह अनुदान मंजूर करून एकूण ८३२ कोटी रुपये दिले आहेत. अनावधानाने काढण्यात आलेल्या एका परिपत्राकामुळे काही शेतकरी लाभापासून वंचित राहीले होते, आता त्यांनाही अनुदान मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



२४ सप्टेंबर २०२४ रोजी अनुदाना संदर्भातले एक परिपत्रक विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने निर्गमित केले होते. त्यातून मृद व जलसंधारण विभागाने सरळ खरेदी पद्धतीने संपादित केलेल्या जमीनधारक शेतकर्यांना वगळे होते. सदर शेतकर्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती. शासन तथा प्रशासन स्तरावर झालेली चुक नंतर लक्षात आली. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अमरावती येथील विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त संघटनेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात झालेली चुक दुरूस्त करून अनुदान देण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले होते.

परंतु, एक वर्ष उलटून गेले असताना सुद्धा सदर विषयावर निर्णय झाला नव्हता. या संदर्भात आमदार प्रताप अडसड यांनी सुध्दा पाठपुरावा केला होता. अखेर मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी संघटनेच्या पदाधिकार्यांसमवेत बैठक बोलावून सानुग्रह अनुदान देण्या संदर्भातील आदेश तातडीने काढण्याचे निर्देश उपस्थित अधिकार्यांना दिलेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता अखेर मंत्री संजय राठोड यांनी केली. यासाठी त्यांचे संघटनेच्या वतीने आभार मानन्यात आले. संघटनेच्या वतीने केलेल्या पाठपुराव्याला यशस्वीता प्राप्त झाल्यामुळे विदर्भातील शेतकर्यांनी बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेचे आभार मानून आनंद व्यक्त केला.

# धारणीत मुसळधार पावसाची हजेरी, तापमानात मोठी घट



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८धारणी**धारणी शहरात बुधवारी सायंकाळी अचानक ढगाळ वातावरण निर्माण झाले आणि त्यानंतर मुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावली. जवळपास एक तास कोसळलेल्या पावसामुळे शहरासह परिसर अक्षरशः जलमय झाला. गेल्या काही दिवसांपासून वाढत्या उष्णतेमुळे नागरिक हैराण झाले होते. तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे गेल्याने उकाड्याचा त्रास सहन करावा लागत होता. मात्र, बुधवारी झालेल्या जोरदार पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून तापमानात लक्षणीय घट झाली आहे. त्यामुळे नागरिकांना थोडा दिलासा मिळाला. धारणी तालुक्यात पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकरी वर्गामध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळत आहे. अनेक शेतकर्यांनी आधीच आपल्या शेतांची मशागत पूर्ण करून ठेवली होती. या पावसामुळे जमिनीत ओलावा निर्माण झाला असला तरी पेरणीला सुरुवात करायची की नाही, या बाबत शेतकरी विचार करीत आहे. धारणी शहरासह आसपासच्या ग्रामीण भागातही पावसाची चांगली नोंद झाली. काही ठिकाणी रस्त्यांवर पाणी साचल्याचे चित्र दिसून आले. तरीही या पावसामुळे शेतकरी, पशुपालक तसेच सर्वसामान्य नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. मान्सूनच्या आगमनाची चाहूल देणार्या या पावसामुळे मेळघाटातील शेतकर्यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहे.

# हूमणी अळीविरुद्ध प्रकाश सापळ्यांचा प्रयोग

## खरीप पिकांच्या संरक्षणासाठी शेतकऱ्यांमध्ये जनजागृती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८टाकरखेडासंभू-**

खरीप हंगामाच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून तालुका कृषी अधिकारी कार्यालयामार्फत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती व प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून हूमणी अळी नियंत्रण मोहिमेला गती देण्यात आली आहे. पूर्णानगर येथील शेतकरी उमेश महिंगे यांच्या शेतात तालुका कृषी अधिकारी उत्कर्षा भोसले यांच्या उपस्थितीत हूमणी अळी नियंत्रणासाठी प्रकाश सापळ्यांचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. यावेळी पाणी फाउंडेशनच्या मेंटर रूपाली ठाकरे यांनी शेतकऱ्यांना हुमणी अळीच्या जीवनचक्राबाबत, तिच्या प्रादुर्भावामुळे होणारे नुकसान आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. हूमणी अळी नियंत्रणासाठी शेतकऱ्यांना एकात्मिक व्यवस्थापन पद्धती अवलंबण्याचे आवाहन करण्यात आले. मॉन्सूनचा पहिला मोठा पाऊस झाल्यानंतर रात्री बाहेर पडणारे भुंगेरे गोळा करून नष्ट करणे तसेच शेतात प्रकाश सापळ्यांचा वापर करून भुंग्यांचे प्रमाण कमी करणे, हे प्रभावी उपाय असल्याचे सांगण्यात आले. याशिवाय जैविक बुरशीचा चांगल्या कुजलेल्या शेणखतात मिसळून वापर केल्यास हूमणी अळीवर प्रभावी नियंत्रण मिळवता येते. कच्चे किंवा अर्धवट कुजलेले शेणखत वापरणे टाळावे, कारण ते हूमणीच्या भुंग्यांना आकर्षित करते, असा महत्त्वपूर्ण सल्लाही यावेळी शेतकऱ्यांना देण्यात आला. या कार्यक्रमास सहायक कृषी अधिकारी रुणाली पाटकर, पाणी फाउंडेशनच्या मेंटर रूपाली ठाकरे तसेच गावातील अनेक शेतकरी उपस्थित होते. आतापर्यंत आष्टी, आसरा, मारकी खारतळे, भातकुली, म्हैसपूर आदी गावांमध्येही हूमणी अळी नियंत्रणासाठी प्रकाश सापळ्यांची प्रात्यक्षिके घेण्यात आली.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# दर्यापुरातील विकासकामांची सीईओंकडून झाडाझडती

## निकृष्ट कामांबाबत कारवाईचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती, –** जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांनी मंगळवारी (ता.१६) सायंकाळी दर्यापूर तालुक्याचा दौरा करून विविध विकासकामांची पाहणी केली. यावेळी प्राथमिक आरोग्यकेंद्र, ग्रामपंचायती, पंचायत समिती तसेच विविध विभागांच्या योजनांचा सविस्तर आढावा घेतला. दौऱ्याची सुरवात प्राथमिक आरोग्यकेंद्र, येवदा येथील भेटीने झाली. केंद्र परिसरातील अस्वच्छता पाहून मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त करीत अधिकाऱ्यांना खडसावले. तसेच पुढील दौऱ्याच्या वेळी अशी स्थिती दिसता कामा नये, असे निर्देश तालुका वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय अधीक्षकांना दिले. यावेळी कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीची पडताळणी करण्यात आली. संभाव्य मॉन्सून परिस्थिती लक्षात घेऊन पुरेसा औषधसाठा उपलब्ध ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. रुग्णांसाठी उपलब्ध बेडशीट, उशा व ब्लँकेटची प्रत्यक्ष पाहणी करून त्यांच्या स्वच्छतेबाबत समाधानकारक व्यवस्था राखण्यास सांगितले.



ऑपरेशन थिएटर, प्रसाधनगृहे व इतर आरोग्य सुविधांची पाहणी करून आवश्यक सुधारणा करण्याची सूचना त्यांनी दिली. त्यानंतर पंचायत समिती दर्यापूर येथे आयोजित आढावा बैठकीत विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रधानमंत्री आवास योजनेतील प्रलंबित घरे तातडीने पूर्ण करणे, टप्पा-एक व टप्पा-दोनमधील घरकुले पूर्ण करणे, एफटीओ एका आठवड्यात पूर्ण करणे तसेच लाभार्थ्यांचे हप्ते कोणत्याही परिस्थितीत प्रलंबित ठेवू नयेत, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा आढावा घेताना घरकुलांची मस्टर त्वरित काढणे, सर्व पंचनामे पाच दिवसांत पूर्ण करणे, आधार सीडिंगसाठी विशेष शिबिरे घेऊन पंधरा दिवसांत काम पूर्ण करणे तसेच कोणतीही बिले प्रलंबित ठेवू नयेत, असे निर्देश देण्यात आले.

# कर्जमाफीच्या अटींवर शेतकऱ्यांचा संताप

## सरसकट कर्जमाफी द्या, वरुड येथील तहसीलदारांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८वरुड**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेतील जाचक अटी रद्द करून शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी, या मागणीसाठी शेतकऱ्यांनी तहसीलदारांना निवेदन दिले. मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला.

शासनाने २०१९ ते २०२६ या कालावधीत घेतलेल्या दोन लाख रुपयांपर्यंतच्या अल्पमुदत पीककर्जाची माफी जाहीर केली असली, तरी योजनेतील विविध अटींमुळे अनेक शेतकरी लाभापासून वंचित राहणार असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. २०१९ च्या महात्मा ज्योतिराव फुले कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना केवळ




५० हजार रुपयांपर्यंतच कर्जमाफी देण्याची तरतूद अन्यायकारक असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. तसेच दोन लाख रुपयांपेक्षा अधिक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना अतिरिक्त रक्कम भरल्याशिवाय कर्जमाफीचा लाभ मिळणार नसल्याबद्दलही नाराजी व्यक्त करण्यात आली. २०२२ ते २०२५ दरम्यान नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान मिळण्यासाठी २०२५-२६ व २०२६-२७ या वर्षांतील कर्जाचीही नियमित परतफेड करण्याची अट घालण्यात आली आहे. ही अट शेतकरीविरोधी असल्याचा आरोप करण्यात आला. तथापि, २०१९ च्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांवरील ५० हजार रुपयांची मर्यादा रद्द करावी, सर्व शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत सरसकट कर्जमाफी द्यावी, ओटीएसअंतर्गत अतिरिक्त रक्कम भरण्याची अट रद्द करावी, प्रोत्साहनपर अनुदानासाठी चार वर्षे नियमित कर्जफेडीची अट मागे घ्यावी, २०१७ च्या कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या ६.५६ लाख शेतकऱ्यांना लाभ द्यावा, पीकविमा योजनेतील जाचक अटी रद्द करून एक रुपयात पीकविमा योजना पुन्हा सुरू करावी, पेरणीपूर्वी कर्ज खात्यांचे पुनर्गठन करून शेतकऱ्यांच्या खात्यात आवश्यक निधी जमा करावा, गेल्या तीन वर्षांतील नापिकी, नैसर्गिक आपत्ती आणि शेतमालाच्या घसरलेल्या दरांमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असल्याने शासनाने अटींचे जाळे न पसरवता सरसकट कर्जमाफी द्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. निवेदन देताना गिरीश कराळे, राजेंद्र बहुरूपी, राजाभाऊ कुकडे, समीर गौस अली, आशिष श्रीराव, हर्षल गलबले, बाबाराव इंगळे, संजय डफरे, रूपेश फुसे, सोपान ढोले, किशोर भोंड, सूरज वडस्कर, तेजस बेलसरे, वीरेंद्र देशमुख, योगेश देशमुख, राधेश्याम धुर्वे, अनिरुद्ध देशमुख, किशोर हेलोडे, संजय वानखडे, हिदायत खान, प्रीतम सुपले, अजय देशमुख, प्रफुल्ल काकडे, प्रकाश बेलखेडे, कपिल अकर्ते यांच्यासह तालुक्यातील अनेक शेतकरी उपस्थित होते.

# बांधावरील झाडे लागवड योजनेचे अनुदान रखडले

**तांत्रिक सहायकांनी रोजगार सेवकावर फोडले खापर**

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८पथ्रोट**

बांधावरील झाडे लागवड करणे' या योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्याने कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतरही अनुदानापासून सदर शेतकरी आजही वंचित आहेत. मस्टरच निघाले नाही, असे कारण देत तांत्रिक सहायकाने अनियमिततेचे खापर रोजगार सेवकावर फोडले आहे. त्यामुळे हे प्रकरण शेतकऱ्यांना मनस्ताप देणारे ठरत आहे. २०२३ ला पंचायत समिती, अचलपूर येथे क्रांती मुळे या शेतकऱ्याने सदर योजनेचा लाभ मिळण्यासाठी अर्ज दाखल केला होता. त्याच्या



वर्षभरानंतर सदर अर्जाला मंजुरी मिळाली. एक वर्ष अर्ज पेंडिंग राहिल्यामुळे पुन्हा एकदा त्याला लागणारी कागदपत्रे अर्जदाराकडून मागविण्यात आली. मग अर्जदारानेही त्याची पुन्हा पूर्तता केली. तेव्हा कुठे तो अर्ज १० मार्च २०२४ ला मंजूर करण्यात आला, मग अनुदानाचे मस्टर सुरू झाले. अडीच वर्षासाठी अडीच लाख रुपयांचे अनुदान मिळेल, असे अर्जदाराला सदर यंत्रणेकडून सांगण्यात आले होते. परंतु दोन वर्षांत नियमानुसार अडीच वर्षे पूर्ण होत असतानाही पूर्ण रक्कम न मिळता ती फक्त ३३, ८०२ रुपये एवढीच मिळाली. यादरम्यान पंचायत समिती, अचलपूर येथील तांत्रिक सहायकांना सदर शेतकऱ्याने वारंवार फोनद्वारे संपर्क करून अनुदानाच्या बाबतीत विचारणा केली. परंतु शासनाकडून अनुदान प्राप्त झाल्यावर ते तुमच्या खात्यात जमा करण्यात येईल, असे प्रत्येक वेळी त्यांना उत्तर मिळाले. त्यानंतर अनुदान जमा होण्याचा योग आलाच नाही. योजना अडीच लाखांची असताना मुळे यांच्या अर्जाला एक लाख शेचाळीस रुपयांची मंजुरी मिळाली खरी, पण अडीच वर्षांत फक्त ३३, ८०२ रुपये अनुदान प्राप्त झाले.

# विहिगावातील नागरिकाला पाजले विष

## कुटुंबीयांचा आरोप, निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८ अंजनगावसुर्जी,**

तालुक्यातील विहिगाव येथील रहिवासी दादाराव भगाजी अभ्यंकर यांना विष पाजल्याचा गंभीर आरोप करण्यात आला. त्यामुळे याप्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधितांविरुद्ध तातडीने कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी कुटुंबीयांनी खासदार अनिल बोंडे तसेच प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मिलिंद दादाराव अभ्यंकर यांनी दिलेल्या निवेदनानुसार १० जून २०२६ रोजी सकाळी सुमारे ९.३० वाजताच्या सुमारास निखिल गणेशे व त्याच्यासोबत असलेल्या अन्य तीन अनोळखी व्यक्तींनी दादाराव अभ्यंकर यांना विषारी पदार्थ पाजले.



ही माहिती स्वतः दादाराव अभ्यंकर यांनी सिद्धार्थ गुणवंत अभ्यंकर यांना दिली, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. घटनेनंतर दादाराव अभ्यंकर यांची प्रकृती खालावल्याने त्यांना उपचारासाठी जिल्हा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

मात्र, तेथे अपेक्षित उपचार न मिळाल्याने त्यांना पुढील उपचारासाठी अमरावती येथील खासगी हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. सध्या त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली आहे. यासंदर्भात रहिमापूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असली तरी अद्याप संबंधित संशयित आरोपींना अटक करण्यात आली नसल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. तसेच दादाराव अभ्यंकर यांची प्रकृती गंभीर असतानाही त्यांचा मृत्युपूर्व जबाब अद्याप नोंदविण्यात आलेला नसल्याबद्दलही कुटुंबीयांनी आश्चर्य व्यक्त केले आहे.

सदर प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच पीडित कुटुंबाला न्याय मिळावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# नांदगावपेठ येथे श्रीरामचंद्र संस्थानतर्फे स्वर्गरथ सेवेला प्रारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८नांदगावपेठ,**

नांदगावपेठ गावातील स्मशानभूमी गावापासून लांब अंतरावर असल्यामुळे मृत्यूसारख्या अत्यंत दुःखद प्रसंगी नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. ही गरज ओळखून श्रीरामचंद्र संस्थानच्या वतीने गावासाठी स्वर्गरथ (वैकुंठरथ) सेवा सुरू करण्यात आली आहे. या सेवेसाठी हिंदू स्मशान संस्था, अमरावतीच्या वतीने अधिकमासानिमित्त शववाहिका हिंदू स्मशानभूमी संस्थेचे अध्यक्ष ॲड. आर. बी. अटल यांच्या सहकार्यातून श्रीरामचंद्रांच्या




चरणी समर्पित करण्यात आली. त्यामुळे नांदगावपेठ व परिसरातील नागरिकांना अंत्यविधीच्या वेळी सन्मानपूर्वक आणि तत्पर सेवा उपलब्ध होणार आहे. या उपक्रमामुळे दुःखद प्रसंगी मृताच्या कुटुंबीयांना मोठा आधार मिळणार असून सामाजिक बांधीलकी जपणारा हा उपक्रम असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

गावाच्या दृष्टीने ही सेवा अत्यंत उपयुक्त ठरणार असून नागरिकांनी या कार्याचे स्वागत करून संबंधित संस्थांनचे आभार मानले.

समाजसेवेची परंपरा जपत श्रीरामचंद्र संस्थान आणि हिंदू स्मशान संस्था, अमरावती यांनी राबविलेला हा उपक्रम गावासाठी एक महत्त्वाची आणि लोकहिताची सुविधा ठरणार असल्याचे मतही प्रा अरविंद देशमुख यांनी व्यक्त केले.

# व्हिडिओ व्हायरलची धमकी देऊन अत्याचार

## युवतीचा अश्लील व्हिडिओ केला व्हायरल, संशयित अद्याप पसार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती–** ग्रामीण भागात एका विवाहितेवर तिचा अश्लील व्हिडिओ सोशल मीडियावरून व्हायरल करण्याची धमकी देऊन अत्याचार करण्यात आला, तर शहरात एका युवतीचा व्हिडिओ युवकाने व्हायरल केल्याची घटना घडली. ग्रामीण भागात दर्यापूर ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली. एका महिलेचा अश्लील व्हिडिओ संशयित गणेश वामन कास्देकर (वय ३५) याने तयार केला होता. त्याचे म्हणणे न ऐकल्यास हा व्हिडिओ लोकांना दाखवेल, अशी धमकी विवाहितेला संशयित युवकाने दिली. व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन त्याने पीडित महिलेस दुचाकीवर बसवून एका गावात निर्जनस्थळी नेले. तेथे तिच्याशी बळजबरीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले, असा आरोप पीडित विवाहितेने तक्रारीत केला आहे. त्या आधारे दर्यापूर पोलिसांनी संशयित गणेश कास्देकर विरुद्ध लैंगिक अत्याचारप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. त्याला अद्याप अटक झालेली नाही. शहरात गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या घटनेमध्ये पीडित अल्पवयीन मुलगी एका महाविद्यालयात शिकते. तिची ओळख सोशल मीडियावरून संशयित राम तायडे (वय २२)



याच्यासोबत झाली. संशयित युवक तिचा पाठलाग करीत होता. आज तुझा वाढदिवस असल्याने कॅफेवर जाऊ, असा आग्रह त्याने केला. युवतीने त्याला नकार दिला असता, सोशल मीडियावरील दोघांचे मॅसेज सर्वांना दाखविण्याची धमकी देऊन तिला ब्लॅकमेल केले. त्यामुळे पीडित अल्पवयीन मुलगी संशयित राम तायडे याच्या दुचाकीवर बसून गेली. दोघेही राजापेठहद्दीतील एका कॅफेत बसले. संशयित राम याने सोशल मीडियावर व्हिडिओ सुरू असताना मुलीशी अश्लील चाळे केले, तिलाही धमकी देऊन तसे चाळे करण्यासाठी भाग पाडले. दोघांचे सोबतचे व्हिडिओ त्याने रेकॉर्ड केले. त्यानंतर त्याने दोघांचा सोबत असलेला व्हिडिओ सोशल मीडियावरून एका स्टोरीला शेअर केला. पीडित अल्पवयीन मुलीच्या तक्रारीवरून गाडगेनगर ठाण्यात संशयित राम तायडेविरुद्ध विनयभंगासह पोक्सो व माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

# कापूस खरेदी करून ६ शेतकऱ्यांची १० लाखांची फसवणूक

## जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्याकडे तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८तिवसा**

कापूस खरेदी केल्यानंतर शेतकऱ्यांचे हक्काचे पैसे न देता तब्बल १० लाख रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार अमरावतीमध्ये समोर आला आहे. गेल्या दोन वर्षांपासून पैशांसाठी हेलपाटे मारणाऱ्या ६ शेतकऱ्यांनी अखेर अमरावतीच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार करत न्याय देण्याची मागणी केली आहे. त्यावरून जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

शिरजगाव मोझरी येथील प्रकाश श्रीराम मेश्राम, निरंजन सूर्यभान कडू, संदीप रामदास जोंजाळकर, दत्ता शंकर खेरडे, साहेबराव नामदेव वैद्य आणि संदीप प्रभाकर उमप या ६ शेतकऱ्यांनी दोन वर्षांपूर्वी आपल्या शेतातील कापूस 'व्यंकटेश कंस्ट्रक्शन'चे मालक सुनील साबुजी यांना विकला होता. कापूस खरेदी करताना साबुजी यांनी शेतकऱ्यांना केवळ ८ दिवसांत आरटीजीएस द्वारे पेमेंट करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, दोन वर्षे उलटूनही पैसे न देता आज देतो, उद्या देतो अशी उडवाउडवीची उत्तरे देऊन शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात आली.

### दिलेले चेकही झाले बाऊन्स

शेतकऱ्यांनी जेव्हा पैशांसाठी तीव्र तगादा लावला, तेव्हा कुठेही तक्रार न करण्याची विनंती करत साबुजी यांनी शेतकऱ्यांना त्यांच्या बँक खात्याचे क्रॉस चेक दिले. एका महिन्यानंतर हे चेक खात्यात जमा करा, पैसे मिळतील असे सांगून त्यांची मनधरणी केली. मात्र, शेतकऱ्यांनी महिनाभराने हे चेक बँकेत जमा केले असता, सहाही शेतकऱ्यांचे चेक बाऊन्स झाले.

अखेर हताश झालेल्या शेतकऱ्यांनी ११ जून २०२६ रोजी अमरावतीच्या जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले आहे. या अर्जासोबत शेतकऱ्यांनी कापूस विक्रीच्या काटा पावत्या आणि बँकेचे बाऊन्स झालेले चेकही पुरावा म्हणून जोडले आहेत.




कष्टाचा घाम गाळून पिकवलेल्या कापसाचे अंदाजे १० लाख रुपये अडकल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले असून, प्रशासनाने या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करून न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी या पीडित शेतकऱ्यांनी केली आहे.



# महापौर सह नगरसेवकांनी बजावला मतदानाचा हक्क

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती–**

अमरावती विधान परिषद मतदानाला आज सकाळी सुरुवात झाल्यानंतर भाजप चे सर्व नगर सेवक महापौर व पदाधिकारी भाजप कार्यालयात एकत्र आले त्यांनतर यांनी तहसील कार्यालय गाठत मतदान केले.त्यानंतर युवा स्वाभिमान,एम आय एम,राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट,बीएसपी,शिवसेना उबाथ,शिंदे गट या सर्व नगरसेवकांनी आपला मतदानाचा हक्क बजावला यावेळी प्रवीण पोटे पाटील यांचा विजय विजय जवळपास निश्चित झाला असल्याचे मत महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी व्यक्त केले. विधान परिषदेची निवडणूक आज होत असून भाजपचे प्रवीण पोटे यांचा विजय निश्चित असल्याचे मत नगरसेवक प्रशांत देशपांडे यांनी यावेळी व्यक्त केले काँग्रेसचे उमेदवार हर्षजीत देशमुख यांनी मैदान सोडल्यामुळे आता भाजपचे प्रवीण पोटे आणि वंचितचे निलेश विश्वकर्मा हे दोन उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. प्रवीण पोटे यांनी गेल्या दोन वर्षापासूनच निवडणुकीची तयारी केलेली असल्यामुळे त्यांच्या प्रचाराच्या तीन ते चार फेऱ्या निवडणुकीपूर्वीच झाल्यामुळे जवळपास सर्वच मतदारांपर्यंत ते पोहोचलेत, त्यामुळे त्यांचा विजय निश्चित समजला जातो.

काँग्रेसने काढलेला व्हीप संपूर्णतः चुकीचा असून जिथे हात वर करून मतदान करावयाचे असते तिथे अशा प्रकारे व्हीप जारी करता येतो व अशाप्रकारे जारी झालेला पक्षादेशाचा अनादर कुणी केल्यास त्याच्यावर कारवाई करून त्याचे सदस्यत्व रद्द करता येते तथापि आज होणाऱ्या विधान परिषदेच्या मतदानात अशा प्रकारे व्हीप काढता येत नाही.त्यामुळे काँग्रेस ने चुकीचा व्हीप काढला असल्याचे ही चर्चा मतदान केंद्रावर सुरू होती.–





# काँग्रेसच्या तटस्थ भूमिकेवर निलेश विश्वकर्मा यांचा हल्लाबोल

## पोटेंविरोधात खरी लढत माझीच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती :**

अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी गुरुवारी मतदान सुरू असताना काँग्रेसच्या तठस्थ भूमिकेवर वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार निलेश विश्वकर्मा यांनी तीव्र आक्षेप घेतला. काँग्रेसचे उमेदवार हर्षजीत देशमुख निवडणुकीत प्रभावीपणे दिसत नसल्याचा आरोप करत काँग्रेसनं आपल्या नगरसेवकांना तठस्थ राहण्याचे निर्देश दिल्याची टीका निलेश विश्वकर्मा यांनी केली. एकीकडं काँग्रेसचे नेते राहुल गांधी देशभर पक्ष विस्तारासाठी प्रयत्नशील आहेत, मात्र अमरावती जिल्ह्यातील काही स्थानिक नेत्यांना पक्षाच्या वाढीची कोणतीही चिंता नाही असं त्यांच्या भूमिकेतून स्पष्ट होतंय असं देखील निलेश विश्वकर्मा यांनी म्हटलंय.



अमरावती विधान परिषद निवडणुकीत भाजपाचे प्रवीण पोटे, काँग्रेसचे हर्षित देशमुख आणि वंचित बहुजन आघाडीचे निलेश विश्वकर्माची तिरंगी लढत असली तरी प्रत्यक्षात प्रवीण पोटे यांच्या विरोधात थेट संघर्ष आपलाच असल्याचा दावा निलेश विश्वकर्मा यांनी केला. काँग्रेसचा उमेदवार प्रचारात प्रभावीपणे दिसत नसल्यानं काँग्रेसने समविचारी पक्ष म्हणून वंचित बहुजन आघाडीला पाठिंबा दिला असं निलेश विश्वकर्मा म्हणाले. मात्र तसं न करता पक्षानं तटस्थ

राहण्याची भूमिका घेतल्यानं भाजपा विरोधी मतांचा नुकसान झाल्याचा आरोप देखील विश्वकर्मा यांनी केलाय.काँग्रेसच्या स्थापनेपासून पक्षांना लोकशाही मूल्यांची जपणूक केली आहे. अशा परिस्थितीत कार्यकर्ते आणि नगरसेवकांना मतदानापासून दूर राहण्याचा संदेश देणं ही लोकशाहीसाठी दुर्दैवी बाब आहे असं निलेश विश्वकर्मा म्हणाले. एखाद्या निवडणुकीत स्वतःचा उमेदवार प्रभावीपणे मैदानात नसल्यास समविचारी पक्षाला पाठिंबा देणं किंवा स्वतंत्र भूमिका स्पष्ट करणं अपेक्षित असतं. मात्र मतदानात करू नका अशी भूमिका घेणं योग्य नाही असं निलेश विश्वकर्मा म्हणाले.

काँग्रेसच्या काही नगरसेवकांनी मतदान केल्याच्या पार्श्वभूमीवर निलेश विश्वकर्मा यांनी त्यांचा स्वागत केलं. ज्या चार–पाच काँग्रेस नगरसेवकांनी मतदान केलं त्यांनी संविधानाने दिलेला अधिकार बजावला आहे. मतदान करणं हा त्यांचा लोकशाही हक्क आहे आणि त्यांनी तो वापरला असं निलेश विश्वकर्मा म्हणाले.

### प्रकाश आंबेडकरांच्या टीकेला दुजोरा :

वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी काँग्रेसवर केलेल्या टीकेच्या संदर्भात निलेश विश्वकर्मा म्हणाले की, निवडणुकीत मतांची गरज असताना काँग्रेस सर्व समाज घटक आणि समविचारी पक्षांना सोबत घेण्याची भाषा करते. मात्र प्रत्यक्षात पाठिंबा देण्याची वेळ आली की ते मागे हटतात. गत काही दिवसांपासून वंचित बहुजन आघाडीला पाठिंबा देण्याबाबत काँग्रेसमध्ये चर्चा सुरू असल्याची माहिती मिळत होती. मतदानाच्या दिवशी अचानक तटस्थतेचा निर्णय जाहीर करण्यात आला. हा निर्णय भाजपा विरोधी मतदारांच्या अपेक्षांना धक्का देणारा असल्याचा आरोप देखील निलेश विश्वकर्मा यांनी केला.



# प्रवीण पोटे यांनी व्यक्त केला विजयाचा विश्वास

## काँग्रेसमधील अंतर्गत गटबाजी समोर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती –**

स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी गुरुवारी सकाळी आठ वाजल्यापासून मतदान प्रक्रियेला सुरुवात झाली. या निवडणुकीत भाजपाचे प्रवीण पोटे, काँग्रेसचे हर्षजीत देशमुख आणि वंचित बहुजन आघाडीचे निलेश विश्वकर्मा यांच्यात तिरंगी लढत होत आहे. जिल्ह्यातील सातही मतदान केंद्रांवर शांततेने मतदान सुरू असून प्रशासनानं कडक सुरक्षा व्यवस्था तैनात केली आहे.

मतदान प्रक्रियेला प्रारंभ होताच भाजपाचे उमेदवार प्रवीण पोटे यांनी अमरावती तहसील कार्यालय तसेच भातकुली पंचायत समिती येथील मतदान केंद्रांना भेट दिली. यावेळी प्रवीण पोटे यांनी विजयाचा विश्वास व्यक्त केला. यापूर्वीच्या दोन निवडणुकांमध्ये मतदारांनी माझ्यावर विश्वास दाखवला. यंदाही मतदारांचे प्रेम आणि पाठबळ कायम असल्याने मी विजयी होईल असा विश्वास आहे, असं प्रवीण पोटे म्हणाले.

या निवडणुकीत भाजपाचे पारडे सुरुवातीपासूनच जड मानले जात आहे. काँग्रेसचे उमेदवार हर्षजीत देशमुख यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर प्रचार आणि मतदारांशी संपर्क टाळल्यानं राजकीय चर्चांना उधाण आलं. प्रकृती अस्वस्थ असल्यामुळं नागपूर येथील रुग्णालयात उपचार घेत असल्याचं देशमुख यांनी एका व्हिडिओद्वारे स्पष्ट केलं होतं. या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या नेत्या यशोमती ठाकूर यांनी देशमुख यांच्यावर गंभीर आरोप करत ते कुठेतरी मॅनेज झाले असल्याचा दावा केला होता. त्यानंतर काँग्रेसमधील अनेक स्थानिक प्रतिनिधींनी तटस्थ भूमिका जाहीर केली असली तरी काँग्रेसचे काही नगरसेवक मात्र मतदानासाठी अमरावती तहसील कार्यालय येथे सकाळीच पोहचले होते.वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार निलेश विश्वकर्मा यांनी निवडणुकीत काँग्रेसच्या मतदारांचा पाठिंबा मिळवण्यासाठी प्रयत्न केले. मात्र, काँग्रेसने अधिकृत भूमिका स्पष्ट न केल्याने त्याचा कितपत फायदा वंचित उमेदवार निलेश विश्वकर्मा यांना होणार याबाबत उत्सुकता आहे.

### २२ जूनला मतमोजणी

मतदानासाठी जिल्ह्यात सात केंद्रांची व्यवस्था करण्यात आली असून, प्रत्येक केंद्रावर अधिकारी, कर्मचारी आणि पोलीस पथक तैनात करण्यात आले आहे. २२ जून रोजी अमरावती शहरातील नियोजन भवन येथे मतमोजणी होणार आहे.

# अखेर रोजच्या त्रासातून शिक्षकांची झाली सुटका

## शालेय स्तरावर माहिती देण्याचा वार फक्त शनिवार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

### निर्णयाबद्दल होतेय शिक्षकवृंदाकडून समाधान व्यक्त

वरिष्ठ पातळीवरून सातत्याने दिवसभरात विविध प्रकारची माहिती शालेय शिक्षकांकडून मागविली जाते. त्यामुळे शिक्षकांना अध्ययन करण्यास वेळ मिळत नसल्याच्या तक्रारी गेल्या अनेक वर्षापासून सातत्याने होत आहेत. शिक्षकांना शैक्षणिक कार्यापेक्षा अशैक्षणिक कामेच अधिक करावी लागत असल्याची ओरड सर्व स्तरातून होत असली तरी याकडे फारसे कुणीच लक्ष




देत नसल्याने शिक्षक हैराण झाले होते. या साऱ्या बाबींचा विचार करून शासनाने आता 'माहितीचा वार शनिवार' ठेवण्याचे निश्चित केल्याने शिक्षकांना मोठाच दिलासा मिळणार आहे. या निर्णयामुळे वरिष्ठ पातळीवरून शालेय स्तरावर मागितलेली ऑनलाइन / ऑफलाइन माहिती दररोज द्यावी लागणार नसून ही माहिती आठवड्यातून एकदाच शनिवारी देण्याचे स्पष्ट आदेश राज्याचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी सर्व विभागीय उपसंचालक, शिक्षणाधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

### निर्णय अत्यंत स्वागतार्ह



येणारी ऑनलाईन व ऑफलाईन माहिती दर शनिवारी सादर करण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत स्वागतार्ह आहे. या निर्णयामुळे शिक्षकांना वारंवार माहिती संकलन व सादरीकरणाच्या कामातून दिलासा मिळणार आहे. परिणामी त्यांचा अधिक वेळ अध्यापन, विद्यार्थ्यांशी संवाद आणि गुणवत्तावाढीच्या उपक्रमांसाठी उपलब्ध होईल. **– राजेश सावरकर,**राज्य प्रसिध्दी प्रमुख,महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती




# अमरावतीत काँग्रेसच्या 'व्हिप'चे वाजले १२

## दिग्गज नेत्यांच्या नाकाखाली नगरसेवकांनी असा धुडकावला आदेश



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

अमरावतीमध्ये काँग्रेसच्या एकूण १६ नगरसेवकांपैकी तब्बल ६ नगरसेवकांनी पक्षाचा आदेश धाब्यावर बसवून थेट मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये धीरज हिवसे, जयश्री जठाले, कुबना तनवीर, अप्सर जहा सादीक शाह, विकी वानखडे आणि प्रशांत महाले या नगरसेवकांचा समावेश आहे.

या सर्व नगरसेवकांनी पक्षाच्या भूमिकेविरोधात जाऊन मतदान केल्याने काँग्रेसचे मोठे नुकसान झाले आहे.काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या आणि माजी मंत्री यशोमती ठाकूर यांच्या होम टाऊनमध्येच काँग्रेसला हा सर्वात मोठा धक्का बसला आहे.

तिवसा नगरपंचायतीमध्ये काँग्रेसच्या एकूण १४ नगरसेवकांपैकी ३ नगरसेवकांनी थेट बंडखोरी करत मतदान केले, तर उर्वरित ११ नगरसेवक तटस्थ राहिले. तिक्यामध्ये पक्षादेश धुडकावून मतदान करणा–यांमध्ये वॉर्ड क्रमांक ८ मधील सीमा खाकसे, स्वीकृत नगरसेवक सचिन बोरे आणि वॉर्ड क्रमांक १२ मधील संगीता राऊत यांचा समावेश आहे.अमरावती विधान परिषद निवडणूक सुरुवातीपासूनच एकतर्फी मानली जात होती. भाजपचे माजी मंत्री प्रवीण पोटे यांच्या बाजूने ही निवडणूक झुकल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होती. काँग्रेसकडून हर्षजीत देशमुख हे उमेदवार रिंगणात आहेत, तर वंचित बहुजन आघाडीकडून निलेश विश्वकर्मा मैदानाव आहेत.

मात्र धक्कादायक बाब म्हणजे मतदानाच्या अंतिम क्षणापर्यंत काँग्रेसचे उमेदवार हर्षजीत देशमुख अमरावतीत फिरकलेच नाहीत, ज्यामुळे स्थानिक पातळीवर मोठा गोंधळ उडाला आणि नगरसेवकांनी थेट क्रॉस व्होटिंग केले.